**<u>नि. दि. दा. क्र. ३०८/२०१८ मधील नि. ३२ वरील आदेश</u>**
**<u>( मारुती चव्हाण वि. अमोल दरवंदर व इतर )</u>**

१. प्रस्तुतच्या अर्जाअन्वये प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी त्यांचेविरुध्द झालेला "No W.S." चा आदेश रद्दबातल करून त्यांची कैफियत कामी समाविष्ट करून घेणेबाबत विनंती केली आहे.

२. प्रतिवादीच्या अर्जामधील कथन असे की, दि.३१/१०/२०१८ रोजी त्यांना दाव्याचे समन्स लागू झाले आहेत. परंतु प्रतिवादी यांना दावेस दि.०१/१२/२०१८ पर्यत कैफियत दाखल करणे आवश्यक होते. तसेच प्रतिवादी यांना सदर कामांची माहिती व संबंधित कागदपत्रे उपलब्ध करून घेवून वेळेत सदर कामी दाखल करता आले नाही. तसेच वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये तडजोडीची बोलणी चालू होती. त्यामुळे प्रतिवादींना कैफियत दाखल करणेस उशिर झालेला आहे. प्रतिवादीनी जाणीवपुर्वक कैफियत देणेस विलंब केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादीविरुदध झालेला "No W.S." चा आदेश न्यायाचे हेतूस्तव रद्द करणेबाबत व प्रतिवादींची कैफियत कामी समाविष्ट करून घेणेबाबत विनंती केली आहे.

३. वादी यांनी नि. ३५ कडे स्वतःचे म्हणणे दाखल करून अर्जास विरोध दर्शविलेला आहे. त्यांना प्रतिवादीचा अर्ज मान्य व कबूल नाही. प्रतिवादी यांनी विलंबाबत मोघम कारण दिलेले आहे. सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज वाचला. अर्जामधील कथने प्रतिवादीनी शपथेवर सांगितलेली आहेत. दाव्यातील रेकॉर्ड तपासले. प्रतिवादी यांच्याच कथनानुसार त्यांना दाव्याचे समन्स दि. ३१/१०/२०१८ इ. रोजी लागू झाल्याचे दिसते. त्या अनुषंगाने प्रतिवादींना कायदयानुसार प्राप्त झालेले ९० दिवस दि.०१/१२/२०१८ रोजी संपतात. परंतु प्रतिवादींनी मुदतीत कैफियत दाखल केली नसली तरी दि.प्र.सं. ऑर्डर ८ रुल १ प्रमाणे नमूद असलेली ९० दिवसांची मुदत ज्या दिवशी संपते. त्याच दिवशी दावा प्रतिवादीच्या

कैफियतीशिवाय पुढे सुरु होतो. याप्रमाणे प्रतिवादीस जवळपास ४ महिने १२ दिवसांचा विलंब झाल्याचे दिसते. सदरचा विलंब हा प्रतिवादी यांना सदर कामांची माहिती व संबंधित कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे तसेच वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये तडजोडीची बोलणी चालू असल्यामुळे कैफियत दाखल करणेस उशिर झालेला आहे हे प्रतिवादींनी शपथेवर कथन केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादीने नमूद केलेले कारण खरे असले तरी आवश्यक त्या कागदपत्रांचा खुलासा अर्जामध्ये नमूद नसल्याने प्रतिवादीनी नमूद केलेले कारण मोघम वाटते. परंतु दावा कायम ताकीदीसाठी व हक्क स्थापनेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादींची कैफियत रेकॉर्डवर आलेस वादातील मूळ प्रश्नाची निर्णिती करण्यास न्यायालयास मदत होणार असून त्यामुळे वादीचे कसलेही नूकसान होणार नाही. नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरून प्रतिवादीची कैफियत रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. परंतु प्रतिवादीच्या विलंबामुळे दावेचे कामकाज लांबणीवर पडलेने प्रतिवादींचा अर्ज रक्कम रु. ५००/– चा खर्च भरणेच्या अटीवर मंजूर करणे मला न्यायाचे वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादींचा अर्ज रक्कम रु. ५००/–(अक्षरी रु. पाचशे मात्र) चा खर्च भरणेच्या अटीवर मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादींनी वरिल खर्च वादी यांना पुढील तारखेदिवशी अगर तारखेपूर्वी देणेचा आहे. या अटीची पूर्तता न झालेस प्रतिवादी विरुध्द योग्य ते आदेश पारित होतील.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Urmila Parashram Koli
Date: 2020.09.30 17:28:08 +0530

मिरज. ( यु. पी. कोळी )

दि. ३०/०९/२०२० २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, मिरज.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | K. U. Nadaf |
| Court | : | II$^{nd}$ Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 30/09/2020 |
| Judgment/Order uploaded on | : | 30/09/2020 |